# प्रकरण - पहिले

# पंढरपूर नगरपालिकेचा ऐतिहासिक आढावा

# प्रकरण - पहिले

## 'पंढरपूर नगरपालिकेचा ऐतिहासिक आढावा.'

**प्रस्तावना :**

लोकशाही शासनपध्दतीत स्थानिक स्वराज्य संस्थांना अतिशय महत्व प्राप्त झालेले आहे. कारण या संस्थामुळे जनतेमध्ये राजकीय जागृती निर्माण होऊन लोकशाहीला पोषक असे वातारण तयार होत असते. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यात भाग घेऊन लोकांना शासनाचे प्रशिक्षण प्राप्त होते. याचा उपयोग राष्ट्रीय स्तरावर होत असतो. आधुनिक युगात बहुतेक सर्व देशांनी स्थानिक स्वराज्य संस्था ह्या शासनाचा अविभाज्य भाग म्हणून स्वीकार केलेला आहे. स्थानिक स्वराज्य संस्था लोकशाहीचा तसेच राष्ट्राचा आधार असतात. आधुनिक युगात समाजवादी विचारसरणी आणि कल्याणकारी राज्याच्या कल्पनेला मान्यता मिळाल्यामुळे राज्याच्या कार्यक्षेत्रात अतिशय वाढ झालेली आहे. परिणामतः सर्व कार्ये केंद्रीय किंवा राज्यसरकारला करणे दुरापास्त झाले आहे. केंद्र किंवा राज्यसरकारला संपुर्ण राष्ट्र किंवा राज्य यांचा विचार करावयाचा असल्याने स्थानिक प्रश्नाकडे लक्ष देण्यास त्याच्यांकडे वेळ नसतो. प्रत्येक ठिकाणच्या प्रशासकीय समस्या ह्या वेगवेगळया असल्यामुळे एकाच प्रकारच्या प्रशासकीय धोरणाचा अवलंब करणे अव्यवहार्य ठरते. प्रत्येक ठिकाणांच्या समस्या सोडविण्यासाठी वेगवेगळी धोरणे आणि ती धोरणे कार्यन्वित करण्यासाठी वेगवेगळया संघटनांची आवश्यकता असते ते केंद्र किंवा राज्य सरकारला शक्य नसते. याशिवाय जनतेचे सहकार्य हा सुध्दा महत्त्वाचा भाग असतो.

जनतेला जर शासनात भाग घेता आला तरच तिला सरकारच्या कार्याबद्दल आत्मीयता वाटते. यातूनच लोकशाहीची कल्पना ही कार्यान्वित होत असते. यामुळे लोकांमध्ये नागरिकत्वाची भावना वाढीस लागून परस्पर सहकार्याची भावना निर्माण होऊ  लागते. ब्राईसच्या मते, "लोकशाहीची सर्वात मोठी निश्चितता म्हणजे स्वायत्त सरकारच्या व्यवहाराची यशस्विता होय." [१] स्थानिक स्वराज्य संस्था उत्तम कार्य करीत असल्या तरच देशात सुराज्य प्रस्थापित होते. स्थिर व लोकशाही प्रधान सरकार हे नेहमी मजबूत अशा स्थानिक स्वराज्य संस्थावर अवलंबून असते. जेम्स ब्रूस या लेखकाच्या मतानुसार, "स्थानिक स्वराज्य संस्थामुळे देशात उत्तम नागरिक बनविण्यास मदत होते."[२] माणसाच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत व मृत्यूनंतरही या संस्थांचा त्याच्याशी संबंध येतो. नागरिकांचा खरा विकास स्थानिक संस्थामुळेच होतो. महात्मा गांधीजीच्या मते, "स्थानिक स्वराज्य संस्था या स्वावलंबी असल्या पाहिजे." गावातील लोकांच्या जास्तीत जास्त गरजा स्थानिक स्वराज्य संस्थेने पुरविल्या पाहिजेत. त्यासाठी लागणारे अधिकार व साधनसामग्री त्या त्या स्थानिक स्वराज्य संस्थाना कायद्याने दिली पाहिजे. देशाला भविष्यकालातील नेतृत्व हे चारित्र्य संपन्न, निःस्वार्थी, सेवातत्पर व त्यागी निपजावे याची काळजी स्थानिक संस्थांनी प्रथम घ्यावयास हवे. [३] स्थानिक स्वराज्य संस्था ह्या सत्ताकेंद्रे न बनता सेवाकेंद्रे बनली पाहिजेत. सत्ता हे साध्य नसून ते एक साधन मानले पाहिजे.

स्थानिक स्वराज्य संस्थाचे महत्व विविध देशातील प्रमुख नेत्यांनी प्रतिपादन केले आहे. जे. एस्. मील, अलेक्स डी. टोक्वेव्हीले, लॉर्ड ब्रूस, एच. के. लास्की, थॉमस

जेफरसन, एम. के. गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, विन्स्टन चर्चिल इत्यादी नेत्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थाबद्दल आपले विचार मांडलेले आहेत. प्रतिनिधिक सरकार हे प्रथम लहान प्रकारच्या स्थानिक संस्थामधूनच निर्माण झालेले असते. या संस्थामुळेच पुढे मोठमोठी बलाढये राष्ट्रे निर्माण झालेली आहेत. लोकशाहीचा खरा पाया हा स्थानिक स्वराज्य संस्थावर अवलंबून असतो. लोकशाही ही खऱ्या अर्थाने या संस्थामुळे निर्माण झाली आहे. स्थानिक स्वराज्य संस्था ह्या लोकशाहीच्या आधारस्तंभ आहेत. इंग्लंड, भारत, जपान, अमेरिका या ठिकाणी राज्यकारभार उत्तम प्रकारे चालविण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांची अत्यंत गरज भासते. विशेषतः नगरपालिकेच्या मदतीशिवाय लोकशाहीप्रधान देशाचा राज्यकारभार चालविणे कठीण जाते. लोकशाही सरकारचा कारभार हा सर्वांच्या विचारांनी व सर्वांच्या संमतीने अथवा निर्णयाने करावयाचा असतो. अशा प्रकारच्या प्रशिक्षणास जे. एस. मिलने राजकीय शिक्षण असे म्हटले आहे.[४]

स्थानिक स्वराज्य संस्था ही लोकशाहीची पहिली पायरी आहे. स्थानिक संस्था ह्या जनतेच्या प्रतिनिधींना राजकीय शिक्षण देत असतात. स्थानिक सरकार हे सहकार्याने व सहमतीने कार्य कसे करावे याचे शिक्षण देते. स्थानिक स्वराज्य संस्था ही लोकांना शिक्षण देणारी व नागरिकांना त्यांच्या हक्कांची व कर्तव्याची जाणीव करून देणारी एक संस्था आहे असे म्हणावयास हरकत नाही. स्थानिक स्वराज्य संस्था ही बहुधा विविध प्रकारचे संशोधन करणारी एक प्रयोगशाळा आहे. या संस्थेमधील जनतेच्या अनुभवाचे योग्य ते संकलन करून या ज्ञानाचा फायदा

केंद्रसरकारला राष्ट्रीय धोरण ठरविताना उपयोगी पडतो. स्थानिक स्वराज्य संस्थामुळे नागरिकांना प्रशासनाचे प्राथमिक धडे मिळतात व नेतृत्वाचे शिक्षण मिळते. स्थानिक स्वराज्य संस्थने नगररचना सुव्यवस्थित करणे व नगरशोभेत अधिकाधिक भर घालणे हा मूळ उद्देश असतो. ॲरिस्टॉटलच्या मतानुसार, 'शहरे ही सौदर्यस्थळे असून त्यात राहणारे नागरिक चांगल्या भवितव्यासाठी नेहमी प्रयत्नशील असतात. इ. स. १९५५ साली हेग येथे 'इंटरनॅशनल युनियन ऑफ लोकल ॲथॉरिटीज' या संस्थेची एक परिषद भरलेली होती. या परिषदेमध्ये आय्. जे. हेवर्ड या ऑस्ट्रेलियन प्रतिनिधीने स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे केवळ मलविष्ठा नष्ट करणारी यंत्रणा नव्हे, अगर रस्ते बांधण्याची प्रशासन यंत्रणा नव्हे, तर ती सांस्कृतिक प्रगती करणारी एक संस्था आहे.' असे प्रतिपादन केले आहे.[५]

लोकशाहीचा पाया सत्तेचे विकेंद्रीकरण हा आहे. प्रो. अ. हक्सले यांच्या मते, 'राजकीयदृष्ट्या चांगला समाज निर्माण करण्यासाठी सत्तेचे विकेंद्रीकरण व जबाबदार स्थानिक प्रशासन निर्माण करणे जरूरीचे असते. लोकशाहीमध्ये सार्वभौम सत्ता ही विकेंद्रीत केलेली असते. परंतु मजबूत अशी लोकशाही स्थानिक स्वराज्य संस्थामुळे प्रस्थापित होते.[६] स्थानिक स्वराज्य संस्थाच्या अस्तित्वाचे खरे कारण लोकशाही व्यवस्था दृढमूल करणे होय. देशात लोकशाही दृढमूल करणे हे नागरिकांच्या नागरी कर्तव्यांच्या जाणिवेवर अवलंबून असते. नागरिकांना त्याच्या कर्तव्याची जितकी जास्त जाणीव असते तितकी लोकशाही दृढमूल झाली असे म्हणायला हरकत नाही. स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू हे

भारतातील प्रांतिक स्थानिक स्वशासन मंत्र्याच्या परिषदेचे १९४८ साली उद्घाटन करताना म्हटले हाते की, खऱ्या लोकशाहीत लोकांचा सक्रीय पाठिंबा अंतर्भूत असतो. लोकमताचा पाठिंबा स्थानिक स्वशासन संस्थाच्याद्वारे व्यक्त होत असतो आणि म्हणूनच स्थानिक स्वशासन संस्था या लोकशाहीचा खराखुरा आधार समजल्या पाहिजेत.[७] स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे नागरिकांवर लोकशाहीचे संस्कार करणाऱ्या पाठशाळा आहेत. आपल्याा समस्या आपणच सोडवू शकतो या अनुभवातून स्थानिक जनतेच्या मनामध्ये आत्मविश्वासाची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न स्थानिक स्वराज्य संस्था करीत असतात.

स्थानिक शासनाचा उल्लेख विविध देशात भिन्न– भिन्न नावांनी करण्यात आला आहे. भारतामध्ये स्थानिक स्वशासन, फ्रान्समध्ये स्थानिक प्रशासन आणि अमेरिकेत म्युनिसिपल प्रशासन असे म्हटले जाते. भारतात जेव्हा ब्रिटिश सरकार होते तेव्हा स्थानिक आणि जिल्हा संस्थांचा उल्लेख स्थानिक स्वशासन किंवा स्वायत्त शासन असा करण्यात येत असे. परंतु स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्यघटनेत ' स्थानिक शासन' असा शब्दप्रयोग करण्यात आला आहे.

**भारतातील स्थानिक शासनाचा इतिहास :**

भारतातील स्थानिक संस्थाचा इतिहास हा अतिशय जुना आहे. भारतामध्ये वैदिक काळापासून स्थानिक संस्था अस्तित्वात होत्या. भारतातील स्थानिक शासनाचा  इतिहास जाणून घेण्यासाठी चार भागात विभागणी करावी लागते.

1) प्राचीन काळ :

प्राचीन भारतामध्ये स्थानिक स्वशासनाचे ग्राम व नगर अशी दोन प्रशासकीय विभागणी करण्यात आली होती. प्राचीन काळात उत्तम नगररचना, नगरप्रशासन अस्तित्वात होते. या काळात लोकनियुक्त मंडळे ग्रामसभेच्या रूपबंधावर निर्माण केली होती तसेच ही मंडळे स्वायत्त होती. इ.स. तिसऱ्या शतकात ग्रीक लेखक मॅगस्थेनेस भारतामध्ये आला होता. त्याने त्यावेळेच्या मौर्य साम्राज्याची राजधानी शहर पाटलीपुत्र याचे वर्णन केलेले आहे.[८] या काळात नगराचा मुख्य अधिकारी 'नागरक' होता. आर्य चाणाक्य हा पाटलीपुत्र शहराचा नागरक असे. कालमानानुसार नगरप्रशासन प्रमुखास नगरपाल, पूरपाल, अशा नावाने संबोधले जाऊ लागले. पाटलीपुत्र शहराच्या प्रशासनासाठी पाच सदस्यांच्या सहा समित्या होत्या. त्यामध्ये –

१) औद्योगिक समिती

२) वाणिज्य व व्यवसाय समिती

३) परराष्ट्र समिती

४) वस्ती समिती

५) कर समिती

६) जनसंख्या समिती.

प्राचीन काळात राजा हा मुख्य अधिकारी होता. राजा महत्वाच्या निर्णयासंबंधी नगरसमिती किंवा मंडळ यांना बोलावून निर्णय घेत असे. कौटिल्याच्या 'अर्थशास्त्र' या ग्रंथात नगरराज्याचा उल्लेख आढळून येतो. याकाळात नगराध्यक्षाला नगराचा शासनकर्ता म्हटले जात असे.

वरील परिस्थितीवरून प्राचीन काळात नगरप्रशासन अतिशय चांगल्या प्रकारचे होते असे समजून येते.

**२) मध्ययुगीन काळ :**

मध्ययुगात प्रांत, परगणा, महल यानंतर स्थानिक स्वशासन संस्था खेडेगांवात निर्माण झाल्या होत्या. अब्दुल फझल यांनी 'ऐन– ए– १. अकबरी' मानुची, यदुनाथ सरकार इत्यादींच्या लिखाणात नागरी प्रशासकीय अधिकारी म्हणून 'कोतवाल' याचा उल्लेख केलेला आढळून येतो.[९] या काळात 'कोतवाल' हा एकमेव अधिकारी सर्व कामे पाहत असे. त्यामुळे या काळात अधिकारांची विभागणी होण्याऐवजी अधिकारांचे केंद्रीकरण झाल्याचे दिसून येते. मोगल काळात नगरमंडळाची किंवा नगरसमित्यांची कार्ये जवळ जवळ बंद पडली होती. राजाच्या ऱ्हासानंतर आणि ब्रिटिश काळ येण्यापूर्वी भारतामध्ये राज्याराज्यात संघर्ष वाढले आणि त्याचा परिणाम सर्वत्र बेबंदशाही निर्माण झाली. या कारणांमुळे भारतात ब्रिटिश शासनव्यवस्था विकसित होण्यापूर्वी नगर स्थानिक शासनव्यवस्था जवळ जवळ नष्ट झाली होती.

**३) ब्रिटिश काळ :**

भारतामध्ये जरी प्राचीन काळापासून स्थानिक शासन संस्था अस्तित्वात असल्या तरी स्थानिक स्वराज्य संस्थाना प्रगत रूप ब्रिटिशांनी दिले. नागरी स्वराज्य संस्था स्थापन करण्याचे कार्य सर्वप्रथम ईस्ट इंडिया कंपनीने इ.स. १६८७ साली सुरू केले. ब्रिटिश राजवट भारतामध्ये सुरू झाल्यानंतर स्थानिक स्वशासन संस्थांचा सर्वांगीण विकास करण्याची अवश्यकता लक्षात घेऊन ब्रिटिश राज्यकर्त्यांनी स्थानिक

स्वराज्य संस्थांच्या रचनेत बदल करण्यास सुरूवात केली. इ.स. १६८७ मध्ये ब्रिटिशानी प्रथम इंग्लिश ब्यूरोच्या धर्तीवर मद्रास महानगरपालिकेची स्थापना केली.[१०] तसेच इ.स. १७२६ मध्ये इतर प्रेसिडेन्सी शहरांमध्ये मुंबई, कलकत्ता येथे महानगरपालिका निर्माण केल्या. इ.स. १७७३ च्या रेग्युलेटिंग ॲक्ट नुसार प्रत्येक प्रेसिडेन्सी शहरात शांतता – न्यायाधीशांची नियुक्ती करून त्यांच्यावर शहरांची स्वच्छता, रस्ते, आरोग्य व किरकोळ भांडणामध्ये न्यायनिवाडा करणे अशा काही जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या. सन १८४८ साली बंगालमध्ये नगरपालिका कायदा करण्यात आला. त्यामध्ये असा निर्णय घेतला की, '२ / ३ नागरिकांनी मागणी केल्यास कोणत्याही शहरात नगरपालिका स्थापन होऊ शकेल.' या निर्णयाला जनतेने कडाडून विरोध केला. इ.स. १८५० साली बंगालचा कायदा ब्रिटिशांना रद्द करावा लागला. इ.स १८५७ मध्ये भारतीयांनी इंग्रजांच्या विरूध्दच्या उठावामुळे ईस्ट इंडिया कंपनीचे सरकार संपुष्टात येऊन ब्रिटिश सार्वभौमत्वाचे सरकार आले इ.स. १८६१ व १८६२ च्या कायद्यांनी नगरपालिकांच्या प्रशासनात किरकोळ बदल केले. इ.स. १८६३ च्या 'रॉयल आर्मि सॅनिटरी कमिशन' ने भारतामधील शहरातील सार्वजिनिक आरोग्य व स्वच्छतेविषयी चिंता व्यक्त केली. त्यामुळे स्थानिक स्वशासन कायदयाच्या आधारे स्थानिक ज़नतेला स्वच्छता, पाणीपुरवठा आणि दिवाबत्ती इत्यादी सुविधा देण्याची जबाबदारी स्थानिक संस्थांवर टाकली गेली.

स्थानिक स्वरूपाची कामे स्थानिक नागरिकाकडून करून घेण्याच्या हेतूने ब्रिटिश सरकारने इ.स. १८६९ साली जिल्हा स्थानिक निधी स्थापन केला. नगर

स्थानिक शासनाच्या विकासाला खरी गती लॉर्ड मेयोच्या काळात मिळाली. स्थानिक शासनाच्या दृष्टीने लॉर्ड मेयोने इ.स. १८७० साली आर्थिक विकेंद्रीकरणाचा प्रस्ताव मंजूर केला.[११] इ.स. १८७० ते इ.स. १८७४ या कालखंडात अनेक प्रांतांमध्ये म्युनिसिपल ॲक्ट्स पास करून नगरपालिकांचे अधिकारक्षेत्र विस्तृत केले. केंद्राकडून प्रांताकडे सत्तेची व अधिकाराची विभागणी करण्यात आली. शिक्षण, आरोग्य, रस्ते सुधारणा, इमारतीचे बांधकाम वगैरे खाती प्रांताकडे सोपविण्यात आली. त्यामुळे केंद्रसरकारवरील आर्थिक बोजा आपोआपच कमी झाला. ब्रिटिश सरकार प्राथमिक स्वरूपाच्या जबाबदाऱ्या स्थानिक संस्थांना सोपवित असे. लॉर्ड मेयोने ठरावामध्ये ब्रिटिश प्रतिनिधी व भारतीय लोक हे दोघे एकत्र येऊन स्थानिक स्वशासन अधिक बळकटी केल्या पाहिजेत असे म्हटले आहे. इ.स. १८७३ नंतर स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये निर्वाचित प्रतिनिधींना स्थान देण्यात येऊ लागले. लॉर्ड मेयोने सर्व प्रांतिक सरकारांना स्थानिक स्वराज्याला उत्तेजन देण्याचा आदेश देण्यात आला.

भारतीय स्थानिक स्वशासन संस्थांच्या विकासामध्ये महत्वाचा टप्पा म्हणजे इ. स. १८८२ चा लॉर्ड रिपनचा ठराव होत. या काळात स्वराज्याची तत्वे सुस्पष्टपणे प्रथमच मांडण्यात आली. इ. स. १८८२ साली भारताचा व्हाईसरॉय पदी नियुक्त झालेल्या उदारमतवादी व राजकीय दृष्टया जागृत असलेल्या लॉर्ड रिपनने १८ मे १८८२ मध्ये एक ठराव मंजूर केला. या ठरावामुळे भारतामधील स्थानिक स्वशासन संस्थांच्या स्वरूपात बदल करून त्या अधिक लोकाभिमुख केल्या गेल्या. त्यामुळे लॉर्ड

रिपनला 'भारतीय स्वशासन संस्थांचे जनक' असे संबोधले जाते.[१२] लॉर्ड रिपनच्या ठरावामुळे स्थानिक स्वशासन संस्थेचा स्वरूप व पाया विस्तृत बनविण्यास मदत झाली. इ.स. १८८२ च्या ठरावात भारतात स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत संसदीय लोकशाहीचे शिक्षण जनतेला मिळावे असा विचार मांडण्यात आला. या संस्थामध्ये सुधारणा घडून येण्यास मदत होऊ लागली. लॉर्ड रिपनचा ठराव हा प्रशासकीय यंत्रणा सुधारण्यासाठी आणि लोकांना राजकीय शिक्षण देण्यासाठी स्विकारलेला होता हे आपणास दिसून येते.

लॉर्ड रिपनच्या ठरावामुळे स्थानिक स्वशासन संस्थेला मूर्त असे स्वरूप प्राप्त झाले. प्रांतिक सरकारांना स्वायत्तता देण्याचे तत्व मान्य होऊ लागले. ग्रामीण मंडळे किंवा संस्था जिल्हाधिकाऱ्याच्या मार्गदर्शन व नियंत्रणाखाली कार्य करू लागल्या. इ. स. १८८३ ते इ.स. १८८५ मध्ये विविध प्रांतांनी कायदे निर्माण करून जिल्हा बोर्ड व जिल्हयांतर्गत तालुका बोर्डची स्थापना केली. लॉर्ड रिपनने भारतीयांना स्थानिक स्वशासन म्हणजे काय? त्यांनी कार्य कसे करावे या बाबतीत सिमित अधिकार देऊन शिक्षित केले. या ठरावाने भारतीय स्थानिक स्वशासन संस्थेच्या विकासाला बऱ्याच मोठया प्रमाणात चालना मिळाली हे दिसून येते. प्रातिनिधिक व जबाबदार संसदीय लोकशाहीचा पाया लॉर्ड रिपन यांच्या उदारमतवादी तत्वांनी घातला गेला. या ठरावाचे स्वागत करताना एस. एन. बॅनर्जी, जी. के. गोखले, फिरोजशहा मेहता, मूखर्जी इत्यादी भारतीय वरिष्ठ नेत्यांच्या मते, 'स्थानिक स्वशासन भारतीय नागरिकांना स्थानिक राजकारण आणि प्रशासन याचे शिक्षण देत देत राष्ट्रीय

स्वशासनाकडे नेईल.'[23] मुंबई व उत्तर पश्चिमी प्रातांत नगरपालिका कायदा १८८३ मध्ये संमत झाला. हा कायदा नगरपालिका स्थापन करण्यासाठी टाकलेले पाऊल होय. या कायद्यानुसार नगरपालिकामध्ये १/४ सदस्य नियुक्त व बाकीचे सदस्य निवडलेले असतील असे बंधन घालण्यात आले होते. इ. स. १९०७ मध्ये स्थानिक स्वराज्यासंबधी विचार करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या विकेंद्रीकरण आयोगाने स्थानिक स्वराज्याच्या अपयशावर कारणमीमांसा केली. या विकेंद्रीकरण आयोगाने स्थानिक स्वराज्याची कार्यपध्दती, निर्वाचनपध्दती इत्यादींमधील दोष दाखवून दिले. ग्राम हे प्रशासनाचे केंद्र मानले गेले. शाही लोकशाही विकेंद्रीकरण आयोगाने स्थानिक स्वशासन संस्थेचा पाया विस्तृत करण्यास मदत केली. स्थानिक पातळीवरील शासनाचे अधिकार व स्वायत्तता वाढवण्याची शिफारशी केल्या होत्या. शासकीय हस्तक्षेप कमी करावा असेही या विकेंद्रीकरण आयोगाने सूचविले होते. इ.स. १९१८ पर्यंत राष्ट्रीय आंदोलनाची व्रीवता वाढत असल्यामुळे ब्रिटिश सरकारने घटनात्मक सुधारणा करण्याची घोषणा केली. पहिले महायुध्द संपल्यानंतर ब्रिटिश सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थाचा विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला. नगर स्थानिक शासनाच्या विकासाच्या दृष्टीने महत्वाचा कायदा म्हणजे १९१९ चा भारतीय प्रशासन सुधारणा (मॉटेग्यू–चेम्सफर्ड) कायदा होय. या कायद्यानुसार जबाबदार शासनपध्दतीचा स्वीकार करण्यात आला. स्थानिक स्वशासन संस्था ह्या लोकप्रतिनिधीकडे सोपविण्यात आल्या. स्थानिक स्वराज्य संस्थांचे कार्य प्रांताच्या मंत्रीमंडळाकडे सोपविण्यात आले. तसेच मतदानाचा हक्क

भारतीयांना काही प्रमाणात देण्यात आला. मतदानाचा अधिकार प्राप्त झाल्यामुळे पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, पुरूषोत्तमदास टंडन इत्यादी नेते नगरपालिकांचे अध्यक्ष म्हणून निवडून येऊन या संस्थांना लोकशाहीचे स्वरूप दिले. मतदार संख्येत वाढ, लोकशाहीकरण, अल्पसंख्याकांना राखीव प्रतिनिधित्व इत्यादी गोष्टीमुळे १९१९ ची सुधारणा योजना थोडया फार प्रमाणात यशस्वी झाली. १९१९ च्या सुधारणा कायदयाप्रमाणे द्विदल शासनपध्दतीचा स्वीकार केला. प्रांतांनी जिल्हा व ग्राम पातळीवरील शासनव्यवस्था ठरवणारे कायदे केले तरीही स्थानिक स्वराज्य संस्थांची प्रगती समाधानकारक होऊ शकली नाही.

भारतीय स्थानिक स्वशासन संस्थाच्या विकासाचा महत्वपूर्ण कायदा १९३५ चा भारतीय प्रशासन कायदा होय. या कायदयामुळे अनेक महत्वाचे बदल स्थानिक स्वशासन संस्थाच्या प्रशासकीय स्वरूपात घडून आले. १९३५ च्या कायद्याने प्रांतिक स्वायत्तता देण्यात आली. त्यामुळे स्थानिक स्वराज्यालाही चालना मिळाली. ग्रामीण क्षेत्रात पंचायतीची निर्मिती करून त्यांना अधिक लोकशाही पायावर उभा करण्याचा प्रयत्न करण्यात आला. १९३७ च्या प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणूका झाल्या. या निवडणूकांमध्ये अनेक प्रांतात कॉंग्रेसची मंत्रीमंडळे निवडून येऊन अधिकाररूढ झाली. इ.स. १९३५ नंतर नगरपालिकांची पुनर्रचना करण्यास सुरवात झाली. भारतात मुंबई प्रांतात इ.स. १९३९ साली सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्थांची आर्थिक परिस्थिती, नगरपालिका प्रशासनाचा दर्जा, नगरपालिका प्रशासनाच्या कार्यात वाढ इत्यादी सर्व गोष्टींचा विचार करण्यासाठी प्रो. काळे यांच्या

अध्यक्षतेखाली स्थानिक स्वराज्य समिती नेमण्यात आली. परंतु लगेच प्रांतिक मंत्रिमंडळांनी राजीनामे दिल्यामुळे व द्वितीय महायुध्दामुळे स्थानिक स्वराज्य संस्थाच्या प्रगतीला खीळ बसली ती स्वातंत्र्य मिळेपर्यंत होती.

**४) स्वातंत्र्योत्तर काळ :**

१५ ऑगस्ट १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतामध्ये स्थानिक शासनाच्या नवीन युगास प्रारंभ झाला. भारतीय स्वातंत्र्यानंतर नगरपालिकांच्या पुनर्रचनेबद्दल उत्साह निर्माण झाला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या यंत्रणेची पुनर्रचना लोकशाही पार्श्वभूमीवर करण्यात आली. भारतातील राज्यकर्त्यांनी लोकशाही नियोजनाचे तत्व अंगीकारले. भारतातील स्वशासन संस्थांना स्वातंत्र्याच्या खुल्या वातावरणात कार्य करण्याची व्यापक अशी संधी प्राप्त झाली. इ. स. १९४८ मध्ये तत्कालीन केंद्रीय आरोग्यमंत्री अमृत कौर यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या भारतीय प्रांताच्या स्थानिक स्वराज्य मंत्र्यांची परिषदेच्या उद्‌घाटन प्रसंगी भारताचे हंगामी पंतप्रधान पंडित नेहरू म्हटले की, 'स्थानिक स्वराज्य संस्थाच खऱ्या लोकशाहीचा पाया असतो व तो असावा, जोपर्यंत खालच्या पायापासून लोकशाही बांधता येत नाही, तोपर्यंत उच्च स्तरावरील लोकशाही यशस्वी होणार नाही.[१४] स्थानिक स्वराज्य संस्था ह्या लोकशाहीचा पाया असतात. पाश्चिमात्य विचारवंत जे. एस. मिल व हेरॉल्ड लास्की यांनी ही यशस्वी लोकशाहीचा पाया हा स्वायत्त अशा स्थानिक स्वशासन संस्था आहेत असे म्हटले आहे.[१५]

स्वातंत्र्योत्तर काळातील स्थानिक स्वराज्य संस्थांवर गांधीवाद, राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्वे, उदारमतवाद इत्यादी तत्वांचा प्रभाव पडलेला

आपणास दिसून येतो.[१६] स्वातंत्र्यानंतर भारत देशामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था अधिक लोकाभिमुख व्हाव्यात म्हणून नवनवे प्रयोग करण्यात आले. स्वातंत्र्यानंतरच्या काळात घटनेच्या ४० व्या कलमानुसार 'स्थानिक स्वराज्याचा मुळ घटक म्हणून ग्रामपंचायती स्थापन करण्याचा' प्रयत्न सुरू झाला. सर्व राज्यांनी विकेंद्रीकरणाचे कायदे निर्माण केले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिकारात वाढ करून त्यांना स्वायत्तता देण्यात आली. लोकशाही प्रौढ मतदान पध्दतीने निर्वाचन होऊ लागले. स्थानिक स्वराज्य संस्थांची आर्थिक उत्पादन साधनांतही वाढ करण्यात आली. इ.स. १९५१–१९५२ पासून संपूर्ण राष्ट्रांत सामूहिक विकास योजनांचे कार्यक्रम सुरू झाले. १९५३ साली पूरक अशी राष्ट्रीय विकास योजना राबविण्यात आली. बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशीनुसार त्रिस्तरीय योजनेचा अंमल सुरू झाला. स्थानिक स्वराज्य संस्थाची दोन पातळयांवर प्रशासकीय विभागणी करण्यात आली. ग्रामीण भागासाठी पंचायतराज संस्था आणि शहरासाठी नगरपालिका व महानगरपालिका अशी प्रशासकीय व्यवस्था निर्माण करण्यात आली.

स्थानिक लोकांचा राजकीय सहभाग वाढावा, विकास प्रक्रियेत लोकांनी पुढाकार घेतला जावा, त्यांना खऱ्या अर्थाने राजकीय सत्ता मिळावी ही भावना जनतेच्या मनात वाढतच गेली. भारतीत संसदेने २२ डिसेंबर १९९३ रोजी ७३ वी, व २३ डिसेंबर १९९३ रोजी ७४ वी घटनादुरूस्ती मंजूर करून ग्रामीण व शहरी भागातील स्थानिक स्वराज्य संस्थाच्या बाबतीत महत्वपूर्ण तरतूदी केल्या.[१७] ७३ व्या घटनादुरूस्तीन्वये संविधनात नव्याने ९ वा भाग समाविष्ट करून अनु. २४३, २४३–A पासून २४३–O पर्यंत नवे अनुच्छेदही अंतर्भूत केले. तसेच ११ वी

अनुसूची जोडली गेली. अनु. २४३ नुसार पंचायत ही स्थानिक शासनाची संस्था म्हणून घोषित करण्यात आली. ७४ व्या घटनादुरूस्तीने भारतीय संविधानात 'भाग – ९ A' समावेश करण्यात आला. ७४ वी घटनादुरूस्ती, १९९३ नागरी प्रशासनाची संबंधित असून त्यात नगरविकासाशी संबंधित असलेले १८ विषय परिशिष्ट १२ मध्ये दिलेले आहेत. नगर नियोजन, सामाजिक, आर्थिक विकास, पायाभूत सुविधा, शेतीविकास, जलव्यवस्थापन, अपारंपारिक ऊर्जाविकास, नागरी सेवा– सुविधा, अग्निशामक सेवा, दारिद्रयानिर्मूलन, पर्यावरण– संवर्धन, सांस्कृतिक विकास इत्यादी विषय ग्रामीण आणि नागरी प्रशासनाकडे सोपविलेले आहेत. त्याचे प्रशासन सक्षम करण्याच्या दृष्टीने निवडणूक, वित्तव्यवस्था, लेखा–परिक्षा इत्यादी बाबींची स्पष्ट तरतूद ७३–७४ व्या घटनादुरूस्तीअन्वये करण्यात आलेली आहे. स्थानिक शासनास १९९३ च्या घटनादुरूस्ती अन्वये घटनात्मक दर्जा दिलेला आहे.

आज शहरी समाजाच्या बदलत्या महत्वकांक्षा आणि गरजांच्या प्रचंड रेटयामुळे नगरपालिका प्रशासनाची रचना व त्यांच्या समोरील प्रश्नांचे स्वरूप अमुलाग्रपणे बदलले आहे. जनतेच्या विकासासंबधीच्या महत्वाच्या गोष्टी स्थानिक नेत्यांना पुरवल्या जातात तसेच स्थानिक लोकांच्या समस्यांची जाण स्थानिक लोकांना जास्त असते आणि त्यातूनच त्यांना निर्णय घ्यावयाचे असतात आणि म्हणूनच नगरपालिका प्रशासनाचा अभ्यास करण्याची प्रबळ इच्छा आणि या इच्छेतून 'पंढरपूर नगरपालिका विकास योजना' या विषयाचा अभ्यास करण्यासाठी दहावी पंचवार्षिक योजना (२००२–२००७) हा मर्यादित कालावधी घेतला आहे.

पंढरपूर शहरामध्ये विविध जाती – धर्माचे लोक राहतात. पंढरपूर शहरातील वाढत्या लोकसंख्येमुळे समस्या निर्माण झालेल्या आहेत. त्यामुळे जागेचा प्रश्न, पाणीप्रश्न, अस्वच्छतेचे प्रश्न निर्माण झाले आहेत. शहरीकरणामुळे अस्वच्छतेचे प्रमाण वाढून जनतेचे सार्वजनिक आरोग्य धोक्यात आले आहे. पंढरपूर हे प्राचीन धार्मिक तीर्थक्षेत्र असल्यामुळे शहराच्या साफसफाईकडे नगरपालिकेने प्रथमपासूनच कशाप्रकारे लक्ष दिले आहे व तेथील जनतेच्या मागणीनुसार सोई– सुविधा देण्यात आलेल्या आहेत की नाही. यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. अन्न, वस्त्र व निवारा या लोकांच्या दैनंदिन गरजांची पूर्तता करण्यासाठी नगरपालिकेने वेगवेगळया विकास योजना राबविलेल्या आहेत याचा अभ्यास केलेला आहे.

**विषयाचे महत्व :**

भारतामध्ये ब्रिटिश काळापासून नवनव्या प्रशासनाचा अवलंब करण्यात आला. त्यामध्ये महानगपालिका व नगरपालिका यासारख्या संस्थांचा समावेश होतो. स्थानिक स्वराज्य संस्था ह्या स्थानिक कार्याचे क्षेत्र म्हटले जाते. पंढरपूर नगरपालिकेची स्थापना ब्रिटिश राजवटीत १२ ऑक्टोबंर १८५५ मध्ये झाली. पंढरपूर हे धार्मिक तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिध्द आहे. पंढरपूरच्या वारीला लाखो भाविक देशाच्या कानाकोपऱ्यातून चालत प्रवास करीत येतात. त्यामुळे नगरपालिका कोणकोणत्या मुलभूत सुविधा यात्रेकरूंना देतात. ब्रिटिश राजवटीपासून नगरपालिकेने स्वतंत्र आरोग्य विभाग स्थापन केला आहे. पंढरपूर शहरातील लोकसंख्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे पंढरपूर नगरपालिकेच्या

प्रशासनावर कामाचा ताण पडत आहे. पंढरपूर शहराच्या विकासात नगरपालिकेची भूमिका महत्वाची आहे.यामुळे नगरपालिकेचा अभ्यास करणे गरजेचे आहे. नगरपालिकेचा विकास, प्रशासन, विविध विकास योजना या दृष्टीकोनातून अभ्यास झालेला नाही आणि तो अभ्यास करणे गरजेचे आहे.

**विषय निवडीचे उद्देश :**

प्रस्तूत संशोधनासाठी पंढरपूर नगरपालिका विकास योजना (दहावी पंचवार्षिक योजना २००२—२००७) या विषयाची निवड केली आहे. हा विषय संशोधनासाठी निवडण्याचा उद्देश थोडक्यात पुढीलप्रमाणे :—

१) पंढरपूर नगरपालिकेच्या स्थापनेपासून आढवा घेणे.

२) पंढरपूर नगरपालिकेने राबविलेल्या वेगवेगळया विकास योजनाचा अभ्यास करणे.

३) यात्रा काळातील नगरपालिकेच्या पायाभूत सुविधाचा अभ्यास करणे.

४) पंढरपूर शहरातील राजकीय, सामाजिक, आर्थिक व्यवस्थेचा थोडक्यात अभ्यास करणे.

५) नगरपालिकेचा प्रशासकीय व कार्यकारी विभाग कशा प्रकारचे कार्य करतात याचा आढावा घेणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तूत संशोधनासाठी प्रामुख्याने ऐतिहासिक व ग्रंथालयीन पध्दतीचा वापर केला आहे. वेगवेगळया ऐतिहासिक साधनांच्या माध्यमातून माहिती संकलन करून

त्याचे व्यवस्थित विश्लेषण केले आहे. तसेच शासनाचे वेगवेगळे अहवाल, माहिती पुस्तिका याच्याद्वारे माहितीचे संकलन केले आहे.

**माहितीचे संकलन :**

प्रस्तूत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांच्या आधारे माहितीचे संकलन केले आहे. यात प्रामुख्याने ऐतिहासिक साधनसामग्री, पंढरपूर शहराचे गॅझेटियर सेंसस हॅंडबुक, नगरपालिकेचे वार्षिक अहवाल व पंढरपूर शहराशी संबंधित पुस्तके यांचा समावेश केला आहे. तसेच वेगवेगळी मासिके, वर्तमानपत्रे व इंटरनेट यांच्या माध्यामातून माहिती गोळा केली आहे.

**माहितीचे विश्लेषण :**

प्राथमिक व दुय्यम साधनांच्या आधारे केलेल्या माहितीच्या संकलनांचे क्रमवार पध्दतीने विश्लेषण केले आहे. तसेच आवश्यक तेथे आकडेवारीचे विश्लेषण, नकाशे, तक्ते यांचा वापर करण्यावर भर दिला आहे. अशा प्रकारे या संशोधनाचे सुत्रबध्द पध्दतीने विश्लेषण केले आहे.

**आजपर्यंत झालेले लिखाण :**

१) जी. पलानीथुराई यांनी 'डायनिमिक्स ऑफ न्यू पंचायत राज इन इंडिया – खंड – २' या पुस्तकामध्ये भारतातील पंचायतराज व्यवस्थेचा उदय आणि विकास यांचा थोडक्यात आढावा घेतलेला आहे.

२) सुहास पळशीकर व नितिन बिरमल यांनी 'महाराष्ट्राचे राजकारण व राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ' या पुस्तकात महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील बदलत्या स्थानिक राजकीय घडामोडीचा आढावा घेतलेला आहे.

३) डॉ. डी. डी. रणनवरे यांनी 'हिस्ट्री ऑफ सोलापूर' या ग्रंथामध्ये सोलापूर शहराच्या व सोलापूर जिल्ह्यातील वेगवेगळ्या तालुक्यातील तीर्थक्षेत्राचा आढावा घेतला आहे.

४) डॉ. बेणारे गोपाळ – यांनी 'राणा पंढरीचा' या पुस्तकामध्ये पंढरपूर शहराचा व विठ्ठल मंदिराचा तसेच शहराच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय इतिहासाचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

५) प्रा. कुलकर्णी अ. ना – 'भारतातील स्थानिक स्वशासन' प्रस्तुत पुस्तकामध्ये लेखकाने महाराष्ट्रातील पंचायत राज्यव्यवस्थांच्या तीन टप्यांच्या व महाराष्ट्रातील नागरी स्थानिक स्वशासन संस्थांचा ऐतिहासिक व स्वातंत्र्योत्तर काळातील बाबींचा थोडक्यात आढावा घेतला आहे.

६) डॉ. भोळे भास्कर लक्ष्मण – 'भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण' – या पुस्तकामध्ये लेखकाने भारतीय राजकारण आणि शासन कसे गुंतागुंतीचे आहे हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच भारतीय गणराज्याच्या यशापयाशाचा चिकित्सक ताळेबंद मांडला आहे.

७) डॉ. भोगले शांताराम– 'भारतातील स्थानिक शासन' प्रस्तुत पुस्तकामध्ये लेखकाने भारतातील नगर स्थानिक संस्थाचा इतिहास, स्थानिक स्वराज्य संस्थेचे स्वरूप कार्याचा सखोल व विस्तृत अभ्यास मांडलेला आहे.

८) डॉ. बढे जी. एस– 'भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था' (उद्गम आणि विकास) प्रस्तुत पुस्तकामध्ये लेखकाने स्थानिक स्वराज्य संस्थाची निर्मिती, कल्पना, कार्य व विकास वेगवेगळया टप्पांवर होत गेला याचे विस्तृत लिखाण केलेले आहे.

**पंढरपूरची व्युत्पत्ती :**

प्राचीन काळापासून पंढरपूरचा उल्लेख वेगवेगळया नावांनी केलेला दिसतो. 'पंढरी फगणिपूर, पौंडरिक क्षेत्र, पंडरंगपल्ली पंडरिपूर, पांडूरंगपूर इत्यादी नावे वेगवेगळया काळात मिळालेली आहेत'.[१८] पंडरिका, पंडरिआ, पंडरी – पंढरी असे नामांतर होत गेले आणि त्याला 'पूर' हे नगरपाचक नाव लावले. पंडरीपूर, पंढरीपूर आणि कालांतराने पंढरपूर या शब्दाची निर्मिती झाली.

**पंढरपूर शहराचे भौगलिक स्थान :**

पंढरपूर हे शहर १७°.५० उत्तर अक्षांश व ७५°.५० पूर्व रेखांशावर आहे. पंढरपूर हे शहर भीमा नदीच्या उजव्या बाजूस वसलेले आहे. पंढरपूरमध्ये भीमा नदीचा प्रवाह अर्धचंद्राकृती आहे म्हणून त्या नदीला चंद्रभागा असे म्हटले जाते.[१९] महाराष्ट्रातील सोलापूर जिल्हयामधील पंढरपूर हे तालुक्याचे ठिकाण आहे. सोलापूर जिल्हाच्या पश्चिमेस पंढपूर हे शहर आहे. पंढरपूर तालुक्याच्या सभोवताली हा माढा, मोहोळ, मंगळवेढा,सांगोला व माळशिरस हे शेजारील तालुकाच्या सिमा आहेत. पंढरपूरचा विकास जलद गतीने होत असल्याने पंढरपूर शहर महाराष्ट्रातील प्रमुख शहराशी राज्यमहामार्गानी जोडलेले आहे. पंढरपूर शहरामधून नॅरोगेज व ब्रॉडगेज रेल्वेमार्ग जात आहे तसेच तो पंढरपूर – मिरज आणि कुर्डुवाडी या दक्षिणमध्य लोहमार्गानी जोडलेला आहे.[२०] पंढरपूर –मिरज हा लोहमार्ग २०१० पर्यत ब्रॉडगेज होणार आहे तर सध्या पंढरपूर – कुर्डुवाडी हा लोहमार्ग ब्रॉडगेज आहे. तसेच पंढरपूर – लातूर ब्रॉडगेज लोहमार्ग चालू आहे.

पंढरपूर नगरपालिकेचे इ.स. १९९९ पर्यंतचे क्षेत्रफळ १२.०८ चौरस कि. मी. होते.[२१] इ.स. २००० मध्ये इसबावी व टाकळीचा काही भाग नगरपालिकेत समविष्ट करण्यात आला आहे. त्यामुळे नगरपालिकेच्या क्षेत्रफळात ५.२ चौ. कि.मी वाढ झाली.[२२] नगरपालिकेचे सध्याचे एकूण क्षेत्रफळ १७.२८ चौरस कि. मी एवढे आहे.

**प्राचीनकालीन पंढरपूर शहर :**

पंढरपूरचा इतिहास पहात असताना पंढरपूरास पंढरी, पांडूरंगपल्ली, पांडूरंगपूर, पंडरिपूर इत्यादी वेगवेगळया नावांचा उल्लेख आढळून येतो. काही विद्वानांच्या मते, 'पंढरपूरचा शोध भागवत व महाभारत पूर्वकालीन आहे.[२३] पुंडलिकाच्या भक्तीसाठी श्री विठठ्ल वैकुंठ सोडून पंढरपूर येथे येऊन विटेवर उभा राहिला अशी व्युत्पत्ती लावली जाते. पंढरपूर येथील भीमा नदीचा उल्लेख श्रीपाद भागवत व महाभारत यामध्येही आढळून येतो. भागवतात स्कंद ५, अध्याय १९ मध्ये भीमा नदीचा तसेच महाभारतातही भीष्मपर्व अध्याय ९ मध्ये चंद्रभागा नदीचा उल्लेख आढळतो. डॉ. सांकलियांचे अभ्यास कागदपत्रे असे दर्शवितात की, पंढरपूर तीर्थक्षेत्र हे दुसऱ्या शतकात अस्तित्वात असले पाहिजे व लोकवस्ती ही विठठ्ल मंदिराच्या भोवती असल्याचे मत व्यक्त केले आहे.[२४] सोनार जातीतील 'मालू' नावाच्या व्यक्तीने 'मालू तारण' नावाचा ३२ अध्यायात ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथाचे महत्व मान्य केल्यास पंढरपूरचा इतिहास चौथ्या व पाचव्या शतकापासून सापडतो.[२५] शालिवाहन राजाचा प्रधान रामचंद्र सदाशिव सोनार याने दिंडिरवन तोडून पंढरपूर नगराची स्थापना केली असा उल्लेख या ग्रंथात आढळून येतो. पंढरपूरच्या अस्तित्वाबद्दल

'फादर उलरी' या फ्रेंच अभ्यासकांच्या मते, 'The oldest mention of Pandharpur is in the inscription dating a back as ५१६ A.D.[२६] पंढरपूरच्या प्राचीन आस्तित्वाचा सर्वात जुना लेख इ. स. ५१६ च्या ताम्रपटावरील आहे व याचा उल्लेख म्हैसूर सरकारच्या १९२९ सालच्या पुरातत्व खात्याच्या अहवालात आहे. राणा पंढरीचा या पुस्तकानुसार आनंद रामायणात भीमा नदीचा उल्लेख आहे. प्रभू रामचंद्रानी या तीर्थक्षेत्राला भेट दिल्याचा प्रसंग लिहिला आहे.[२७]

**मध्ययुगन कालीन पंढरपूर :**

पंढरपूर क्षेत्राचा महिमा संत ज्ञानेश्वर व संत नामदेवांच्या काळात सर्वत्र गायिला जात होता.[२८] ज्ञानेश्वरांच्या काळानंतर महाराष्ट्रावर मुस्लिम सत्तेने आक्रमण केले तरी पंढपूरच्या यात्रेत खंड पडला नाही. १४ व्या शतकामध्ये महाराष्ट्राच्या राजकीय स्थितीत स्थित्यंतरे होऊन मुस्लिमांचे राज्य सुरू झाले. त्याचबरोबर त्यांनी धर्म, चालीरिती, रितीरिवाज, भाषा याची सक्ती करू लागले. मुस्लिम राजवट ही जबरदस्तीने कारभार करीत असे. त्यामुळे मराठी भाषेवर तुर्की,उर्दू भाषेतील शब्दाचे अतिक्रमण होऊ लागले त्यातुनच हिंदू–मुस्लिम संघर्षाला सुरूवात झाली. हिंदूनी मुस्लिमांशी संघर्ष करून आपली आस्मिता टिकवून ठेवली. इ. स. १४९० – १५०८ या काळामध्ये अहमदनगरच्या निजामशाहीमध्ये दलपतीराज नावाचा अर्थमंत्री होता. त्याने नृसिंह प्रसाद नावाच्या एक ग्रंथ धर्मशास्त्रवर रचला आहे या ग्रथांत पुंडरिक व पुंडरी क्षेत्र याविषयी माहिती त्यांनी तीर्थसार नावाच्या भागात वर्णिले आहे.[२९]

विजयनगरच्या कृष्णदेवराय यांनी इ.स १५०९—१५२९ या कालवधीमध्ये विठ्ठलाची मूर्ती बिजयनमरला घेऊन गेले. त्यांनी पंढरीचे महात्म विजयनगरला प्राप्त व्हावे या इच्छेसाठी विजयनगरमध्ये स्वतंत्र मंदिर बांधून 'विजय विठ्ठल' म्हणून मंदिरात मूर्तीची स्थापना केली.[३०] संत भानुदास यांनी विठ्ठलाची मूर्ती खूप प्रयत्न करून परत पंढरपूरला घेऊन आले.

अफझलखानाने इ.स. १८५१ ला पश्चिम महाराष्ट्रामध्ये असलेल्या हिंदूच्या पवित्र धार्मिक स्थळांवर स्वारी केली. त्याने तुळजापूर, पंढरपूर या धार्मिक क्षेत्राच्या ठिकाणी जाऊन नासधूस करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी अफझलखानाने पंढरपूरमधील विठ्ठलमूर्ती नष्ट करण्याचा प्रयत्न केला परंतु तेथील बडवे मंडळीनी विठ्ठलमूर्ती पंढरपूर पासून जवळच असलेल्या देगांव या छोटयाशा खेडयातील पाटीलांच्या विहीरीत लपवून ठेवून तिचे संरक्षण केले. अफझलखानाने पंढरपूर सोडताच पुन्हा विठ्ठलाची मूर्ती पंढरपूरमध्ये आणण्यात आली.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर शाहू राजाची सुटका झाली व पंढरपूरचा हळूहळू विकास व्हावयास सुरवात झाली. पेशवाईच्या काळामध्ये विठ्ठलाच्या मंदिरातील सोळसांबी ओवऱ्या व गोपाळपूरचे गोपाळकृष्णचे मंदिर बांधण्यात आले. चंद्रभागा नदीवर घाट बांधण्यात आले. १८४८ पर्यत पंढरपूर हे सातारच्या छत्रपतीच्या अंमलखाली होते.

पंढरपूरचा विकास होऊन नगरपालिका, दवाखाना, इंग्रजी शाळा, ग्रंथालये, अनाथ बालकाश्रम इत्यादी लोकापयोगी संस्था ब्रिटिश राजवटीच्या काळात स्थापन

झाल्या. पंढरपूर हे धार्मिक तीर्थक्षेत्र आहे. पंढरपूरमध्ये वर्षातून चार मोठया वाऱ्या त्यामध्ये चैत्री, आषाढी, कार्तिकी व माघी अशा यात्रा मोठया भरत असतात. या यात्रांना शेकडो वर्षापासून लाखो भाविकभक्त पंढरपूरला येत असतात. यात्रेकरूच्या दृष्टीने या चारही यात्राचे महत्व अनन्यसाधारण आहे. पंढरपूर हे दक्षिण भारतातील अत्यंत महत्वाचे धार्मिक तीर्थक्षेत्र आहे.

**पंढरपूर नगरपालिका :**

पंढरपूर हे महाराष्ट्रातील एक प्रमुख प्राचीन धार्मिक तीर्थक्षेत्र चंद्रभागा नदीच्या काठावर वसलेले एक शहर आहे. संतांचे माहेरघर, दक्षिणकाक्षी, दक्षिणद्वारका, वारकरी संप्रदायाचे आदयपीठ म्हणून पंढरपूर या तीर्थक्षेत्राचा उल्लेख केला जातो. पंढरपूर शहर इ.स. १७४० – १८५५ या कालावधीत हळूहळू विस्तारीत होत गेले. उत्तरेकडील बाजूस पंढरपूर शहराची सर्व बाजूंनी वाढ झाली. पंढरपूर शहर १९५१ मध्ये १०.५७५ चौरस कि. मी होते. १९१५ मध्ये बार्शी रेल्वे लाईन सुरू झाल्यामुळे रेल्वे स्टेशनच्या पश्चिमेकडील बाजूस व इतर बाजूस शहराचा विस्तार वाढलेला आहे. पंढरपूर – अकलूज आणि पंढरपूर–कराड रोडला अनेक नवीन वसाहती नव्याने निर्माण झालेल्या आहेत त्यामध्ये लाडनगर, मनिषानगर, उजनी पाटबंधारे अशा वसाहती स्थापन झाल्या आहेत. पंढरपूर – अकलूज रोड दरम्यान इसबावी हा भाग नुकताच पंढरपूर शहराशी जोडलेला आहे तसेच लक्ष्मी टाकळीने रेल्वे स्टेशनच्या दरम्यानचा पुंडलिकनगर,गणेशनगर, परदेशीनगर हौसींग सोसायटी हया वसाहतींनी व्यापून गेला आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग, शासकीय कार्यालये,

मध्यवर्ती आयकर विभाग व जीवन महामंडळ कार्यालय ह्या सर्व विभागाला नवीन पंढरपूर शहर म्हटले जाते.

**पंढरपूर नगरपालिकेची स्थापना :**

भारतामध्ये इ. स. १८५० च्या कायदयानुसार नगरपालिका स्थापन करण्यास प्रांरभ झाला.[३१] इ.स १८५० नंतर पंधरावीस वर्षामध्ये भारतात अनेक शहरात नगरपालिका स्थापन झाल्या. पुणे, सोलापूर, ठाणे, नाशिक, बार्शी सातारा, कोल्हापूर, वाई अशा अनेक ठिकाणी नगरपालिका अस्तित्वात आल्या. पंढरपूर नगरपालिकेची स्थापना ब्रिटिश राजवटीत म्हणजेच इ.स. १२ ऑक्टोबंर १८५५ रोजी झाली.[३२]

**पंढरपूर नगरपालिकेचा विकास :**

**पहिला टप्पा : (१८५५—१८८५)**

कलेक्टर व मामलेदार यांच्या पूर्ण नियंत्रणाखाली नगरपालिकची कारकिर्द १२ ऑक्टोबंर १८५५ रोजी पासून सुरू झाली. नगरपालिकेसाठी पंधरा कलमीं यादी तयार केली ती पुढीलप्रमाणे :—

१) नगरपालिका समितीच्या सदस्यांची सभा दरमहा भरण्यात यावी.

२) नगरपालिकेची सभा भरण्यासाठी एक जागा असावी.

३) नगरपालिकेच्या कारकुन हिशोबाचे काम प्रामाणिकपणे करील याच्याबदद्ल जामीन त्याच्याकडून लिहून घेतला जावा.

४) लिखाणाचे व हिशोब ठेवण्याच्य कामासाठी एक कारकून, रस्ते दुरूस्तीच्या कामासाठी एक मेस्त्री, दोन शिपाई व रस्ते स्वच्छ करण्यासाठी चार असामी असावेत.

५) समितीने ठरविलेल्या कोणत्याही खर्चास मामलेदार मार्फत कलेक्टरची मंजूरी घ्यावी.

६) समितीचा जमाखर्च मामलेदारकडून तपासून घेतला जावा.

७) म्युनिसिपल कमिटीबददल जो वसूल होईल तो एका पेटीत जमा करून ती पेटी मामलेदार कचेरीत ठेवली जावी.

८) कोणत्याही नव्या कामाचा नकाशा, आराखडा तयार करून इंजिनिअरची मंजूरी मिळाल्याशिवाय करू नये.

९) शहराचे भाग करून प्रत्येक भागावर कमिशनर नेमावा म्हणजे सुधारणा काय केली पाहिजे व तेथील लोकांचे काय म्हणणे आहे याची चौकशी करून त्या कमिशनरांनी कमेटीस माहिती कळवावी.

१०) सर्व लोकांनी आपापल्या घरासमोरील गटार व रस्त्याची स्वच्छता ठेवावी.

११) रस्ते साफ करणाऱ्या समितीच्या नोकरांनी शहरातील निरनिराळया ठिकाणचे रस्ते साफ करून तेथील कचरा एखादया नेमलेल्या ठिकाणी टाकला जावा.

१२) खुल्या जागेवर अथवा जुनी इमारती सोडून नवीन इमारती बांधायची असल्यास इमारती बांधण्यापूर्वी समितीकडे अर्ज करून परवानगी मिळाल्यानंतर बांधकाम करावे.

१३) नेमून दिलेल्या जागेखेरीज इतर जागी कोणीही घाण केल्यास त्यास मामलेदाराकडून दंड केला जाईल.

१४) घराजवळ पडलेली घाण काढण्यासाठी सूचना देऊनही काढली जात नसेल तर दर दिवसाला दोन आण्यापासून पाच रूपयापर्यंत दंड नगरपालिका घेईल.

१५) समितीचा खर्च भागून राहिलेल्या निधीततून उन्हाळयात रस्त्यावर पाणी शिंपून रात्रीचे दिवे लावावेत.

कामगारांच्या व नागरिकांच्या सोयीसाठी काही समित्या निर्माण केल्या. या समित्यावर १८५५ ते १८५८ या वर्षातील समितीतील सर्वच पंच नागरिकांमधून नेमले होते.[३३] प्रत्येक कार्याबददल कलेक्टरची मंजूरी घ्यावी लागत असल्यामुळे कार्याची पूर्तता होण्यास वेळ लागत असल्याने सरकारी अधिकारी नागरिकांमधूनच पंच नेमले गेले. १८५८ पासून संयुक्त मंडळे आस्तित्वात आल्यापासून १८६७ सालापर्यंत ही व्यवस्था राहिली होती. नगरपालिका १८६२ पासून नगरपालिकेच्या मंडळात कलेक्टर, मामलेदार इत्यादी सरकारी अधिकरी 'एक्स ऑफिशिओ कमिशनर्स' म्हणून नेमण्यात आले.[३४] नगरपालिकामध्ये सरकारकडून व नागरिकामधून अशी एकूण २३ सदस्यसंख्या करण्यात आली. नगरपालिका कारभारात लोकांचे सहकार्य वाढावे या हेतूने नागरिकामधून १ / ३ सदस्यांची संख्या करण्यात आली. कलेक्टर हा बोर्डाचा अध्यक्ष असून सर्वसाधारण समितीच्या सभेला असिस्टेट कलेक्टरच अध्यक्ष म्हणून हजर राहत असे. इ.स. १८७३ च्या कायदयानुसार नगरपालिकेच्या कायदयाने नगरपालिकांना 'कार्पोरेट बॉडी' म्हणून कायदयाचे आस्तित्व प्राप्त झाले. या कायदयामुळे १०००० च्या वर लोकसंख्या असलेल्या शहरातील नगरपालिकांना 'सिटी म्युनिसिपालिटी' चे व कमी लोकसंख्या असलेल्या शहरातील नगरपालिकांना 'शहरी नगरपालिका' चे अधिकार दिले जात असे.

**दुसरा टप्पा : (१८८५ – १९१५)**

ब्रिटिश सरकारने १८८२ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थासंबधी कायदा केला. १८८४ कायदयामुळे नगरपालिकेच्या कारभारविषयी महत्वपूर्ण बदल घडवून आणले गेले ते पुढीप्रमाणे –

१) नगरपालिकेच्या सदस्यापैकी निम्मे सदस्य निवडून देण्याचा अधिकार नागरिकांना मिळाला.

२) नॉमिनेटेड सदस्यापैकी निम्यापेक्षा जास्त सरकारी नोकर नसावेत अशी मर्यादा घालण्यात आली.

३) सिटी व टाऊन हा म्युनिसिपालटी भेद नष्ट केला.

४) एक्स ऑफशिओ सदस्याचा असणारा प्रकार समाप्त केला.

५) नगरपालिकेच्या सदस्यामधून सरकारने अध्यक्ष नेमला जावा व नेमलेला अध्यक्ष सरकारी नोकर असेल तर नगरपालिकेने उपाध्यक्ष निवडावा अशी सवलत दिली.

वरील कायद्यानुसार पंढरपूर नगरपालिकेने आपली एक घटना तयार केली ती खालीलप्रमाणे –

१) नगरपालिकेच्या निवडणूकीसाठी शहराची ९ प्रभगामध्ये विभागणी केली.

२) प्रत्येक प्रभागामधून १ प्रमाणे निवडून आलेले ९ व कमिशनर यांनी नेमलेले सरकारी नोकर व नागरिक असे मिळून ९ असे एकूण १८ सदस्यसंख्या करण्यात आले.

३) नगरपालिका हद्दीमधील वकील, पदवीधर, मॅजिस्ट्रट, ऑनररी आणि नगरपालिकेस वार्षिक दीड रूपया कर भरणाऱ्या लोकांनाच मतदानाचा अधिकार देण्यात आला.

**पहिली निवडणूक :**

नगरपालिकेच्या कामात प्रतिष्ठित नागरिकांना लक्ष देण्यासाठी कमी वेळ मिळतो. त्यामुळे काही सरकारी अधिकाऱ्यांची निवड नगरपालिकेमध्ये करण्यात आली. या सरकारी अधिकाऱ्यामध्ये प्रिसीपल सदर अमीन,डेप्युटी, डिस्ट्रीक्ट मॅजिस्ट्रेट यांचा समावेश होतो. बिनसरकारी सदस्याला अध्यक्ष करण्याची प्रथा १८८४ च्या नगरपालिका कायदयाने सुरू झाली. इ.स १८८५ मध्ये नगरपालिकेच्या निवडणूका प्रथमच गुप्त मतदान पध्दतीने घेतल्या गेल्या. इ.स १८८५ मध्ये पहिला बिनसरकारी अध्यक्ष होण्याचा मान श्री. तुकाराम रामचंद्र कवठेकर यांना मिळाला. परंतु काही कारणाने नगरपालिकेचा अध्यक्ष म्हणून असिस्टंट कलेक्टर बी. आर. हेबलीकर यांची नेमणूक करण्यात आली.[३५] अशा प्रकारे नॉमिनेटेड सदस्य आणि सरकारी अधिकारी अध्यक्ष अशी काही काळ पंढरपूर नगरपालिकेची परिस्थिती होती. शहरामध्येही नगरपालिका स्थापन करता याव्यात यासाठी मुंबई जिल्हा नगरपालिका कायदा १९०१ साली करण्यात आला.

**तिसरा टप्पा : (१९१५—१९४५)**

या काळात नगरपालिकेच्या सदस्य संख्येच्या बाबतीत १९२५ पर्यंत कोणताही बदल झालेला नव्हता.[३६] नगरपालिकेमध्ये १२ निवडून दिलेले व ६ नॉमिनेटेड आणि २ सरकारी नोकर त्यामध्ये पंढरपूर तालुका, उपविभागीय अधिकारी आणि मामलेदार असे सर्व मिळून २० सदस्यसंख्या करण्यात आली. इ.स. १९२६

मध्ये पंढरपूर नगरपालिकेच्या सदस्य संख्येत बदल होऊन ती सदस्यसंख्या २५ करण्यात आली त्यामध्ये २० निवडून दिलेले व ५ व्यक्तीची नेमणूक केली होती. इ. स. १९२४ पर्यंत स्त्रियांना नगरपालिकेचे सदस्य होण्यास बंदी होती.[३७] बॉम्बे म्युनिसिपल रोज ॲक्ट १९२५ च्या कायदयानुसार नगरपालिकेच्या व्यवस्थापनाबाबत जास्त अधिकार नगरपालिकेला मिळाले. इ.स. १९३८ ला स्त्रियांना मतदानाचा अधिकार प्राप्त झाला. १९३८ पासून स्त्रियांसाठी राखीव जागा ठेवण्यात आल्या.[३८]

**चौथा टप्पा : (१९४५ — १९७५)**

इ.स. १९४६ मध्ये नगरपालिकेला 'बरो म्युनिसिपालिटीचे' स्थान प्राप्त झाले. या ठरावामुळे बॉम्बे म्यनिसिपल बरोज ॲक्टेमध्ये सुधारणा करून नगरपालिकेवर व्यापक अशी कर्तव्ये पार पाडण्याची जबाबदारी टाकण्यात आली. १९४६ मध्ये नगरपालिकेची सदस्यसंख्या २९ केली. त्यामध्ये ५ राखीव जागा ठेवण्यात आल्या. त्यापैकी २ जागा हरिजन समाजासाठी, २ जागा मुस्लिमाकरिता आणि १ जागा स्त्रियांसाठी राखीव ठेवण्यात आली. नगरपालिकेच्या सदस्यसंख्येत १९५२ मध्ये बदल करून ३३ करण्यात आली. [३९] पढंरपूर नगरपालिकेची सदस्यसंख्या १९५२ ते १९६४ पर्यंत ९ प्रभागामधून ३३ सदस्य निवडले जात असे. त्यापैकी ५ जागा राखीव ठेवण्यात आल्या. त्यापैकी २ जागा हरिजनासाठी, ३ जागा स्त्रियांसाठी राखीव ठेवल्या. १९६४ पासून अध्यक्ष व उपाध्यक्षाची निवड एका वर्षासाठी केली जात असे.

महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ नुसार प्रत्येक प्रभागातून एकच सदस्य निवडायचा अशी तरतूद केली आहे.[४०] मतदाराची वयोमर्यादा १८ व उमेदवाराची वयोमर्यादा २१ वर्षे करण्यात आली.

**पाचवा टप्पा : (१९७५ — २००७)**

या काळात स्थानिक स्वराज्य संस्थाविषयी ७३वी व ७४वी घटनादुरूस्ती करण्यात आली. ग्रामीण अवस्थेतून शहरीकरणात परिवर्तन होऊ लागलेल्या भागासाठी नगर पंचायत, लहान शहरांसाठी नगरपरिषद आणि मोठया शहरात महानगरपालिका अशी व्यवस्था करण्यात आली. त्यामध्ये वॉर्ड समित्या स्थापना करण्याची सोय करण्यात आली. अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती आणि स्त्रिया यांच्यासाठी आरक्षण ठेवण्यात आले.

महाराष्ट्रातील नगरपालिकेचे कार्य 'महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५' नुसार सिमित करण्यात आले आहे. पंढरपूर शहराचे क्षेत्रफळ जसजसे (दिवसेंदिवस) वाढत गेले तसे पंढरपूर नगरपालिकेच्या कामाचा व्याप वाढला. त्यामुळे नगरपालिकेवर मोठया प्रमाणात आर्थिक भार पडला. पंढरपूर हे धार्मिक तीर्थक्षेत्र असल्या कारणाने शहराच्या साफसफाईकडे नगरपालिकेने सुरूवातीपासून लक्ष दिलेले आहे व चांगल्या प्रकारच्या सोई सुविधा पुरविल्या आहेत. अन्न, निवारा, शिक्षण, आरोग्य या प्राथमिक गरजांची पूर्तता करण्यासाठी नगरपालिकेने भरीव असे कार्य केले आहे.

## संदर्भ सूची

१. भोगले शांताराम – 'भारतातील स्थानिक स्वशासन' शारदा प्रकाशन, वजिराबाद – नांदेड जानेवारी १९७६ पृ. क्र– ३.

२. डॉ. बढे. जी. एस – 'भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था (उदग्म व विकास) हिमालया पब्लिशिंग मुंबई १९७८ पृ. क्र– ९.

३. उपरोक्त – पृ. क्र. – ५—६.

४. उपरोक्त – पृ. क्र– ११—१२.

५. उपरोक्त – पृ. क्र– ८.

६. उपरोक्त – पृ. क्र– १४.

७. माहेश्वरी श्रीराम लोकल गव्हर्नमेंट इन इंडिया– ओरियंट लॉगमन, न्यू दिल्ली– १९७१, पृ.क्र. २३-२४.

८. कुलकर्णी अ.ना.– 'भारतातील स्थानिक स्वशासन', विदयाप्रकाशन, नागपूर. फेब्रवारी २००० पृ. क्र–१४१.

९. उपरोक्त – पृ. क्र–१४२.

१०. निगम एस. आर. – लोकल गव्हर्नमेंट सेंकड एडिशन एस.चांद ॲण्ड कंपनी, रामनगर, न्यू दिल्ली– १९७५, पृ. क्रं १७०.

११. भोगले शांताराम – 'भारतातील स्थानिक शासन', विदया प्रकाशन, नागपूर– जून १९९० पृ.क्र– १५.

१२. प्रा. कुलकर्णी अ. ना. – उपरोक्त पृ. क्र– १४४.

१३. भोगले शांताराम – उपरोक्त शारदा प्रकाशन, वजिराबाद नांदेड, जानेवारी–१९७६ पृ. क्र—२६–२७.

१४. प्रा. कुलकर्णी अ. ना. – उपरोक्त पृ. क्र– १४९.

१५. उपरोक्त पृ. क्र– १४९.

१६. इनामदार ना. र– 'लोकप्रशासन' साधना प्रकाशन, पुणे– १९७५पृ. क्र– १२७.

१७. डॉ. भोळे भास्कर – 'भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण' पिंपळपूरे ॲण्ड कं पब्लिशर्स नागपूर– जून २००३, पृ. क्र– ३५८.

१८. खरे. ग. ह – 'श्री विठठ्ल आणि पंढरपूर', पूणे –१९६३, पृ. क्र– ४८.

१९. गॅझेटिअर ऑफ दि बॉम्बे प्रेसिडिन्स, सोलापूर डिस्ट्रीक्ट ओरिजीनल प्रिंन्टेड इन –१८८४, रिप्रिन्टेड इन १९९७, पृ.क्र.४००.

२०. उपरोक्त – पृ. क्र– ४०१.

२१. डॉ. बेणारे गोपाळ – 'राणा पंढरीचा' श्री संत वाङ्‌मय सेवा प्रकाशन पुणे १९९३ पृ. क्र. ३२.

२२. पंढरपूर नगरपालिका वार्षिक अहवाल, २००१ – २००२ पृ. क्र– १.

२३. डॉ. बेणारे गोपाळ – उपरोक्त, पृ. क्र– २.

२४. डॉ. सांकलिया एच. डी – 'पंढरपूर क्षेत्र विचार व्यक्तीगत कागदपत्र' पुणे.

२५. डॉ. बेणारे गोपाळ – उपरोक्त, पृ. क्र– ४.

२६. उपरोक्त – पृ. क्र– ५.

२७. उपरोक्त, पृ. क्र– ३.

२८. उपरोक्त, पृ. क्र– ६.

२९. खरे. ग. ह – उपरोक्त, पृ. क्र– ३३.

३०. भिगारकर कृ. रा ––'मी विठठ्ल महात्म्य,' पुणे– १९६६ पृ. क्र– १९.

३१. पंढरपूर नगरपालिका वार्षिक अहवाल, १८८७– १८८८, पृ. क्र– १.

३२. उपरोक्त – १८९२ –१८९३, पृ. क्र. १.

३३. उपरोक्त – १८५७ –१८५८, पृ. क्र. २.

३४. उपरोक्त – १८६२ – १८६३, पृ. क्र. २.

३५. उपरोक्त – १८९१ –१८९२, पृ. क्र. १.

३६. उपरोक्त – १९२४ –१९२५, पृ. क्र. २.

३७. उपरोक्त – १९२५ –१९२६, पृ. क्र. २.

३८. उपरोक्त – १९३८ –१९३९, पृ. क्र. १.

३९. उपरोक्त – १९५१ –१९५२, पृ. क्र. २.

४०. जोशी व.शं., जोशी प.व , कायमखाने लीला कृ. – 'महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५', न्यायदिप प्रकाशन, १९९१, पृ. क्र २२.